
# उष्णतेची तीव्रता

# आणि त्या द्वारे मिळणारा उपदेश व शिकवण

ક્રમશ નં: 98



જુમઅહ નો ખુતબહ

17 05 2024

@akkalkuwajiiu

JIIU SOCIAL MEDIA DESK

# उष्णतेची तीव्रता....आणि त्या द्वारे मिळणारा उपदेश व शिकवण

आज आपण या उन्हाळ्याच्या दिवसात जो वाढलेला तापमान बघत आहोत, कल्पना करा की जर एखादा माणूस भर दुपारी उन्हात चप्पल बूट न घालता व डोक्यावर कोणत्याही प्रकारचा कपडा न घेता उभा राहीला, तर त्याचे काय होईल?! अवस्था अशी आहे की उष्णतेची लाट त्याच्या अंगावर धावुन येत आहे ज्यामुळे त्याचे संपूर्ण शरीर घामाने भिजले आहे, तर विचार करा, की अशी व्यक्ती कोणत्या स्थितीत असेल? तो समाधानी असेल? की त्यावर असलेलं संकट आणि दुःख आणखी वाढेल?!

पालनकर्ता पवित्र कुराण मध्ये म्हणतो:

﴿3:190﴾ اِنَّ فِیۡ خَلۡقِ السَّمٰوٰتِ وَ الۡاَرۡضِ وَ اخۡتِلَافِ الَّیۡلِ وَ النَّہَارِ لَاٰیٰتٍ لِّاُولِی الۡاَلۡبَابِ ﴿190﴾ۚ

"पृथ्वी आणि आकाशांच्या उत्पत्तीमध्ये व रात्र आणि दिवसाच्या आळीपाळीने येण्यात त्या ज्ञानी लोकांसाठी फार संकेत आहेत,"

﴿3:191﴾ الَّذِیۡنَ یَذۡکُرُوۡنَ اللّٰہَ قِیٰمًا وَّ قُعُوۡدًا وَّ عَلٰی جُنُوۡبِہِمۡ وَ یَتَفَکَّرُوۡنَ فِیۡ خَلۡقِ السَّمٰوٰتِ وَ الۡاَرۡضِ ۚ رَبَّنَا مَا خَلَقۡتَ ہٰذَا بَاطِلًا ۚ سُبۡحٰنَکَ فَقِنَا عَذَابَ النَّارِ ﴿191﴾

"जे उठता बसता आणि पहुडले असता प्रत्येक स्थितीत ईश्वराचे स्मरण करतात आणि पृथ्वी आणि आकाशांच्या रचनेत मनन व चिंतन करतात. (ते उत्स्फूर्तपणे उद्गार काढतात) ''हे पालनकर्त्या, हे सर्वकाही तू व्यर्थ व निरुद्देश्य बनविलेले नाही, व्यर्थ कर्म करण्यापासून तू पवित्र आहेस. मग हे पालनकर्त्या, तू आम्हाला नरकाग्नीच्या प्रकोपापासून वाचव."

या संदेश वचनात पालनकर्ता सृष्टीतील असंख्य निशाण्यावर चिंतन मनन करण्या बाबत सांगत आहे; म्हणून आम्ही या संदेश वचनाच्या माध्यमातून काही शिकवण आणि मार्गदर्शक तत्त्वे प्राप्त करण्याचा प्रयत्न करुया!!

पहिली गोष्ट: आम्हाला हे माहित असले पाहिजे की यालोकाची उष्णता आम्हाला परलोकातील उष्णतेची आठवण करून देते; कारण पालनकर्त्याने यालोकात स्वर्ग आणि नर्क यांची आठवण करून देण्यासाठी अनेक वस्तूंची निर्मिती केली आहे; म्हणूनच हजरत अबू हुरैरा रज़ि.यांनी वर्णन केले आहे की पैगंबर हजरत मुहम्मद सल्लल्लाहु अलैहि व सल्लम म्हणतात: "जेव्हा उष्णतेची तीव्रता वाढते अशा वेळी नमाजपठण करताना उष्णतेची तीव्रता कमी झाल्यावर नमाज ही उपासना करावी; कारण उष्णतेची तीव्रता नरकाच्या उत्तेजनामुळे आहे."

आणि प्रेषित मुहम्मद सल्लल्लाहु अलैहि व सल्लम यांनी सांगितले की (नरकाच्या) अग्नीने आपल्या पालनकर्त्याकडे तक्रार केली तर तिला प्रत्येक वर्षी दोन वेळा श्वास घेण्यास परवानगी देण्यात आली, एक हिवाळ्याच्या दिवसांत आणि दुसरा उन्हाळ्याच्या दिवसात, आणि जेव्हा आपण तीव्र उष्णता, जास्त थंड अनुभवतो, तर हे नरकाच्या त्याच गरम आणि थंड श्वास घेण्याचा परिणाम आहे.

प्रिय बंधूंनो! जेव्हा पूर्वी होऊन गेलेल्या इस्लामीक विद्वानांच्या समक्ष नरकाचा उल्लेख केला जात असे तर त्यांचे हृदय पालनकर्त्याच्या भयामुळे भयभीत होत असे आणि त्यांच्या डोळ्यांतून अश्रूंचा बांध फुटायचा आणि अशा गोष्टी त्यांच्यासाठी उपदेश ग्रहण करण्याची साधने होत, म्हणूनच हजरत शद्दाद बिन औस रज़ि. जेव्हा झोपण्यासाठी आपल्या बिछान्यावर येत असे, तेव्हा त्यांना झोप येत नसे, आणि त्यांच्या मुखातून हे वाक्य बाहेर पडायचे :

"हे पालनकर्ता नरकाच्या आगीने माझी झोप मोडली आहे"

मग ते आपल्या बिछान्यावरून उठायचे आणि सकाळपर्यंत नमाजपठण करायचे.

हजरत उमर बिन अब्दुल अज़ीज़ रहमतुल्लाहि अलैहि एकदा नमाजपठण या उपासनेत लोकांचे नेतृत्व करत होते, त्यांनी नमाजपठण करताना सूरह अल्लैल सुरू केली, आणि जेव्हा فَأَنذَرْتُكُمْ نَارًا تَلَظَّى

या संदेश वचनापर्यंत पोहोचले,

तर ते फार रडू लागले, आणि जास्त रडल्यामुळे, त्यांना सूरह पूर्ण करता आली नाही, तर त्यांनी दुसरी सुरह पठण करून नमाज पूर्ण केली."

हजरत नोमान बिन बशीर रज़ि. म्हणतात की मी प्रेषित मुहम्मद सल्लल्लाहु अलैहि व सल्लम यांना असे म्हणताना ऐकले: "मी तुम्हाला नरकाच्या आगीबद्दल सावध केले, मी तुम्हाला नरकाच्या आगी पासून सावध केले, जर कोणी व्यक्ती बाजारात असला असता तरी त्याने हे ऐकले असते. वर्णन करणारे म्हणतात की प्रेषित मुहम्मद सल्लल्लाहु अलैहि व सल्लम यांची चादर जी खांद्यावर होती ती त्यांच्या पायावर पडली.

दुसरी गोष्ट: यालोकातील उष्णते पासून स्वतःला वाचवण्यासाठी आपण पालनकर्त्याने दिलेल्या साधनांद्वारे (जसे की एअर कंडिशन, कूलर आणि पंखे इत्यादी) उष्णतेपासून स्वतःचा बचाव करु शकतो, परंतु एक दिवस असा देखील येणार आहे जेव्हा उष्णतेचा तापमान फार जास्त प्रमाणात असेल. या उष्णतेच्या तीव्रतेपासून फक्त आणि फक्त सद्गुण, सत्कर्मच माणसाला वाचवू शकेल. म्हणूनच  हजरत मिकदाद बिन असवद रज़ि. म्हणतात की मी प्रेषित मुहम्मद सल्लल्लाहु अलैहि व यांना असे म्हणताना

ऐकलं आहे की: "पुनरुत्थानाच्या दिवशी सूर्य फार जवळ असेल फक्त एक मैलाचा अंतर असेल, आणि लोकं आपल्या केलेल्या कर्मानुसार घामात बुडलेले असतील त्यांच्यापैकी काही आपल्या घोट्यापर्यंत, काही गुडघ्यापर्यंत, काही कमरे पर्यंत, आणि काही असे असतील ज्यांना घामाने लगाम घातली आहे" हजरत मिकदाद (रज़ि.) म्हणतात की हे म्हणताना प्रेषित मुहम्मद सल्लल्लाहु अलैहि व सल्लम यांनी आपल्या हाताने आपल्या मुखाकडे इशारा केला.

तिसरी गोष्ट: जेव्हा पुनरुत्थानाच्या दिवशी समस्या येवढी गंभीर असेल तर आम्ही सर्व मानवांनी सन्मार्गावर चालावे, सत्कर्म करावे, आणि असे सत्कर्म करावे जेणेकरून आम्हाला पालनकर्त्याच्या अर्शची सावली लाभावी.

प्रेषित मुहम्मद सल्लल्लाहु अलैहि व सल्लम म्हणतात:

"सात प्रकारचे लोक आहेत ज्यांना पालनकर्ता सावली प्रदान करेल,त्या दिवशी त्याच्या सावली शिवाय कोणतीही सावली नसेल. पहिला न्याय करणारा राजा" दुसरा तो तरुण जो आपल्या तारुण्या पासून आपल्या पालनकर्त्याच्या उपासनेत मग्न राहिला, तिसरा तो माणूस ज्याचे हृदय नेहमी मशिदीत अडकलेले असते, चौथे असे दोन लोकं जे पालनकर्त्यासाठी परस्पर प्रेम करतात आणि त्यांचे भेटने व दूर होणे पालनकर्त्यासाठीस असते, पाचवी ती व्यक्ती ज्याला एका सन्माननीय आणि सुंदर स्त्रीने (वाईट हेतूने) आपल्याकडे आमंत्रित केले परंतु त्या व्यक्तीने असं म्हणत (नाकारले) की मी पालनकर्त्याचा भय बाळगून आहे. सहावा माणूस तो आहे जो अशा पध्दतीने गुप्त दान करतो की त्याच्या  डाव्या हातालाही खबर होत नाही. सातवा असा माणूस ज्याने एकांतवासात पालनकर्त्याचे स्मरण केले आणि त्याच्या डोळ्यातून अश्रूंचा बांध फुटला.

चौथी गोष्ट: नरकाच्या आगीच्या तीव्रते आणि उष्णते पासून स्वतःला वाचवण्यासाठी सत्कर्म करावे त्यांपैकी: अनिवार्य नमाजपठण आणि शुक्रवारच्या जुमा या नमाजपठणसाठी सतत मशिदीत जाणे, अंत्यसंस्काराच्यावेळी पठण करण्यात येणारी नमाजीसाठी आणि इतर सत्कर्म करण्यासाठी सन्मामार्गावर चालणे, विशेषत: जेव्हा उष्णता तीव्र असते; कारण केलेल्या प्रयत्ना नुसारच बक्षीस मिळत असते, कदाचित दुपारच्या कडक उन्हात शुक्रवारच्या दिवशी जुमा ही नमाजपठण करून परत येणे, आपल्याला मैदाने हश्र म्हणजे (पुनरुत्थानाच्या दिवशी जमा होण्याचे मैदान) येथून परत येण्याची आठवण करून देते; कारण कयामत म्हणजे न्यायाचा दिवस शुक्रवारी स्थापित होईल आणि त्या दिवशी दुपारच्या वेळी, स्वर्गात जाणारे लोकं स्वर्गात निवांत झोपलेले असतील, आणि नरकात जाणारी माणसं नरकातील शिक्षा भोगत असतील.

पालनकर्ता पवित्र कुराण मध्ये म्हणतो:﴿24﴾ اَصۡحٰبُ الۡجَنَّةِ يَوۡمَئِذٍ خَيۡرٌ مُّسۡتَقَرًّا وَّاَحۡسَنُ مَقِيۡلًا ﴿25:24﴾

"बस्स, तेच लोक जे स्वर्गाला पात्र आहेत त्या दिवशी चांगल्या जागा मिळवतील आणि दुपार घालविण्यासाठी चांगली जागा मिळवतील."

आणि नरकात जाणाऱ्या लोकांबद्दल आहे:

﴿68﴾ ثُمَّ اِنَّ مَرۡجِعَهُمۡ لَاۡاِلَى الۡجَحِيۡمِ ﴿37:68﴾

आणि त्यानंतर त्यांची रवानगी त्याच नरकाग्नीकडे होईल.

पालनकर्ता आम्हा सर्व मानवांना सन्मार्गावर चालण्याची सद्बुद्धी दे!


मराठी अनुवादक

मोलाना मुजीब साहब

उस्ताद जामिया अक्कलकुवा

नाशिर

जामिया इस्लामिया इशातुल उलूम

अक्कलकुवा



हर हफ्ते तरजमे के साथ खुतबा हासिल करने के लिए हमारा सोशल मीडिया डेस्क ज्वाइन करें .

👇 क्लीक करें 👇

WhatsApp

JIIU MEDIA

@akkalkuwajiiu